झोपडपट्टीतील लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ नाशिक जिल्हा (2015 Ÿö 2020)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयाचा
¯öß<“ö.›ß.(Ph.D) पदवीसाठी सादर करावयाच्या
शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

कोळी सुलक्षणा हरी

<´ö.<., <´ö.×±ú»ö (†£ö¿ööÃ¡ö)

मार्गदर्शक

डॉ.एम.एन.बिरादार

<´ö.<., <´ö.±úß»ö.¯öß<“ö.›ß.

सहयोगी प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक अर्थशास्त्र विभाग

कै.दिगंबरराव बिंदु महाविद्यालय भोकर

ता.भोकर जि.नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

•ö»ö - 2019

झोपडपट्टीतील लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ नाशिक जिल्हा

प्रस्तावना :

भारताला स्वातंत्र्य मिळून आज ७० वर्ष झाले असले तरी आजही भारतात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता दिसून येते. या आर्थिक विषमतेला थोड्या बहुत प्रमाणात भांडवलशाही किंमत यंत्रणा तर बऱ्याच अंशी भांडवलशाहीच्या आधारभुत संस्था कारणीभुत झालेल्या आहेत. समाजातील मालमत्तेच्या विषम विभाजनामुळे तसेच निरनिराळ्या व्यवसायामध्ये आणि उद्योगामध्ये कामगारांना व मजुरांना प्राप्त होणाऱ्या कमी अधिक उत्पन्नामुळे आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. मालमत्तेच्या खाजगी हक्कामुळे मुठभर धनिक वर्गातील व्यक्तींना भांडवलावरील व्याज जमिनीचा खंड भाडे पट्टी, नफा अशा वेगवेगळ्या मार्गाने उत्पन्न मिळते. भांडवलशाही देशात प्रामुख्याने दोन वर्ग दिसून येतात. एक जमीन जुमला मालमत्ता स्वाधीन धनिकाचा व दुसरा वर्ग केवळ श्रमशक्तीशिवाय दुसरे काहीच हाती नसलेला निर्धनाचा श्रमिकाचा धनिकांना वेगवेगळ्या मार्गाने उत्पन्न मिळते उलट क्षमिक वर्गाला मजुरीशिवाय पर्याय नसतो. औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या भांडवलाही देशात उत्पन्नाचा ३० ते ३५ टक्के भाग एकुण लोकसंख्येच्या १० टक्के असलेल्या भांडवलदार वर्गाकडे तर उरलेले ६५ ते ७० टक्के उत्पन्न उर्वरित ९० टक्के जनतेला ¯öö¯Ÿö ÆöŸö.

निरनिराळ्या व्यवसायात मजुरीचे दर वेगवेगळे असतात, वैद्यकिय, अभियांत्रिकी, वकील इत्यादी उच्च व्यवसायात प्रवेश मिळविण्यासाठी शिक्षणावर बराच खर्च करावा लागतो. त्यामुळे अशा व्यक्तींचा पुरवठा त्या त्या व्यवसायाच्या मानाने कमी असतो. त्यामुळे त्यांचे उत्पन्न जास्त असते. गरीब जनतेला उच्च शिक्षण घेणे परवडत नाही त्यामुळे या लोकाकडे उत्पन्न प्राप्त होत नाही. परिणामतः आर्थिक विषमता निर्माण होते. समाजातील आर्थिक विषमता नष्ट करणे हे भारतातील आर्थिक नियोजनाचे एक प्रमुख उदीष्ट आहे. पण ते आजपर्यंत साध्य झालेले दिसून येत नाही. आर्थिक विषमतेचा समाजावर मोठ्या प्रमाणात परिणाम होऊन

देशामध्ये अनेक समस्या निर्माण होतात. त्यामध्ये सध्या देशात निर्माण झालेली समस्या म्हणजे झोपडपट्टी हे होय.

झोपडपट्टी समस्या देशात उग्र स्वरुप धारण करीत आहे. अलिकडेच जारी करण्यात आलेल्या जनगणना अहवालानुसार देशात झोपडपट्यामध्ये राहणाऱ्यांची संख्या वाढली आहे. देशात ५२ मिलियन म्हणजे ५२० लाख किंवा सव्वा पाच कोटी नागरीक झोपडट्ट्यामध्ये वास्तव्य करत होते. तर नवीन आकडेवाडीनुसार हा आकडा ६५ मिलियन म्हणजे साडे सहा कोटीच्या जवळपास पोंहचला आहे. देशभरातील झोपडपट्याचा विचार केला तर असे दिसुन येते की, देशातील राजधानीचे ठिकाण असलेल्या दिल्लीत एकुण लोकसंख्येपैकी २० टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. दिल्ली येथील भलस्वा झोपडपट्टी ही यमुना नदीच्या काठावर आहे. त्याच प्रमाणे जॉय सिटी कोलकत्यामध्ये झोपडपट्टी क्षेत्र बसंती झोपडपट्टी म्हणून ओळखले जाते. कोलकत्याच्या एकुण लोकसंख्येपैकी एक तृतीयाश लोकसंख्या झोपडपट्टीत राहते तर ३५००० नोंदणीकृत झोपडपट्या आहेत. चैनई हे दक्षीण भारतीय राज्य तामिळनाडूची राजधानी असून ते देशातील चौथे मोठे शहर आहे. २०११ पर्यंत चैन्नई मधील लोकसंख्येपैकी २९ टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत राहत आहेत. तसेच नोचिकुणम स्लम येथे १३०० झोपडपट्या आहेत. येथील ५ हजार लोक दारिद्र्य रेषेखालील आपले जीवन जगत आहेत. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईमध्ये भारतातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावी म्हणून ओळखल्या जाते. धारावी मध्य मुंबईतील महिम नदीच्या १७५ कि.मी.च्या परिसरात पसरलेली आहे. धारावी हे मुंबई शहरातील अनेक झोपडपट्यापैकी एक आहे. नवाब शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लखनऊच्या लोक संख्येत बरेच लोक गरीब आहेत जे झोपड पट्टीत राहतात लखनऊ शहरातील ४६० झोपडपट्या २०००० लोक झोपडट्यात राहतात. बहुतेक लोक रोजच्या मजुरीसाठी जवळच्या जिल्ह्यातून लखनऊला स्थलांतरीत झालेल्या आहेत. त्याचप्रमाणे ऑरेंज सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नगपुरमध्ये ४२४ झोपडपट्यात १४२०० पेक्षा जास्त लोक राहतात आणि सुमारे १६०० हेक्टर जमीन या झोपडपट्यांनी व्यापलेली आहे. मुंबई नंतर ही दुसऱ्या क्रमांकाची झोपडपट्टी निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील प्रमुख लहान शहरांनी आता झोपडपट्याचा

विळखा पडला असुन सन २००१ व २०११ च्या जनगणनेनुसार प्रत्येक चौथे कुटूंब हे झोपडपट्टीत वसले आहे. महाराष्ट्रातील लहान मोठ्या ४६ शहरामधील ८०.१८ लाख कुटुंबापैकी तब्बल २०.५० लाख कुटुंबे झोपडपट्टीत राहत असल्याचे जनगणनेतून निदर्शनास आले आहे.

झोपडपट्या निर्माण होण्यास देशातील वाढती लोकसंख्या, दारिद्र्य व बेरोजगारी या गोष्टी जबाबदार आहेत. कारण बेरोजगारीमुळे व्यक्ती रोजगारासाठी शहरी भागात येतात पण शहरामध्ये आल्यानंतर त्यांना राहण्यासाठी हवे असणारे उत्पन्न व मिळणारी पुरेसा जागा उपलब्ध होत नाही. त्यामुळे हे बाहेरुन आलेले लोक शहराच्या आजुबाजुला असलेल्या रिकाम्या जागेवर आपले वास्तव्या करतात. परिणामी तेथे त्यांना जिवनावश्यक असणाऱ्या सोयी सुविधा जसे सांडपाण्याची व्यवथा, पाणी पुरवठा, विज इत्यादी गोष्टी मिळत नाही म्हणून तेथे झोपडपट्ट्याची निर्मीती होते. झोपडपट्टी म्हणजे काय हे खालील व्याख्यावरुन स्पष्ट होते.

झोपडपट्टीची व्याख्या :

1. भारतीय जनगणनेप्रमाणे झोपडपट्टी म्हणजे अशी राहण्याची जागा जी मुळात माणसाला राहण्यासाठी योग्य जागा नाही जी जागा गर्दीची तर आहेच शिवाय सुधारणा होण्यापलीकडे आहे. तिथे चुकीच्या पध्दतीने बांधकाम केले आहे तेथील रस्ते अरुंद आहेत, पुरेशी खेळती हवा नाही, सुर्य प्रकाश नाही, स्वच्छता नाही आणि तिथे राहणे हे माणसाला धोकादायक आणि आरोग्याला हानीकारक आहे.

2. एन.एस.एस.ओ.च्या मते अपुर्ण अस्वच्छ, पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही, घाणीचे साम्राज्य, खराब बांधकाम अशांना झोपडपट्टी म्हटले जाते.

3. **आंतरराष्ट्रीय व्याख्या :** लोकसंख्येची घनता जास्त असलेल्या शहरी क्षेत्र होय. ज्यामध्ये राहणाऱ्या लोकांची उच्च घनता, कमी दर्जाचे ग्रहनिर्माण असते, त्यामध्ये कमी जागेत जास्त लोक वाईट अवस्थेत राहतात. कमी उत्पन्न असलेल्या वाईट अवस्थेत जीवन जगणाऱ्या त्या ठिकाणाला झोपडपट्टी असे म्हटले जाते.

नाशिक जिल्ह्यात सुध्दा मोठ्या प्रमाणात झोपडपट्या दिसुन येतात. जिल्ह्यातील एकुण तालुक्याची संख्या १५ असुन त्यामध्ये सटाणा, सुरगणा, मालेगांव, देवळा, पेठ, दिंडोली, चांदवड, नांदगांव, नाशिक, निफाड, येवला, इगतपुरी, सिन्नर, कळवण, त्र्यंबकेश्वर इत्यादी तालुकयाचा समावेश होते. नाशिक जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५३५० चौरस कि.मी. म्हणजे ५९३० मैल एवढे असून जिल्ह्याची लोकसंख्या ६१०९०५२ लाख एवढी आहे. साक्षरता दर ८०.९६ टक्के एवढा आहे. नाशिक जिल्ह्यात सर्वच तालुक्यात झोपडपट्याची संख्या आढळत असली तरी मुख्य जिल्ह्याच्या ठिकाणी नाशिक शहरात मल्हार खानी, वदरवाडी, पेठरोड, प्रबुद्धनगर, शांतीनगर, पंचशीलनगर, समतानगर, रमाबाई आंबेडकरनगर इत्यादी ठिकाणी झोपडपट्या मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

संशोधन विषयाची निवड :

स्वातंत्र्य प्राप्तीपासुन आजपर्यंत भारताने समाजवादी लोकशाही या तत्वाच्या आधारावर कल्याणकारी भुमिकेचा स्विकार केला. परंतु आज पण भारतात मोठ्या प्रमाणात आर्ीािक विषमता दिसुन येते. आर्थिक विषमतेचा परिणाम असा झाला की देशात दारिद्र्य रेषेखाली लोकांच्या प्रमाणात वाढ झाली त्यामुळे बेकारी वाढली, शहरात रोजगार शोधण्यासाठी आलेल्या नागरिकांमुळे शहरीकरणात वाढ होऊन झोपडपट्याची भरमसाठ वाढ झाली. झोपडपट्यातील नागरिकांना कोणत्याही सोयी सुविधा नसतात ते आपले जीवन बिकट परिस्थितीत काढत †ÃÖŸÖÖŸÖ.

झोपडपट्यातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ नाशिक जिल्हा या संशोधनातून झोपडपट्यातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

आपण स्पर्धेच्या युगामध्ये राहत असून प्रत्येक क्षेत्रामध्ये स्पर्धा आहे. एखाद्या गोष्टीच्या कामगिरीचे मुल्यमापन ही त्या गोष्टीच्या वाढीसाठी व प्रगतीसाठी खुप महत्त्वाची बाजु असते.

कठीण परिश्रम घेतल्याशिवाय कोणतेही कार्य परिपुर्ण होत नसते, भारतामध्ये व महाराष्ट्रामध्ये झोपडपट्टीचे बरेच संशोधन झालेले आहे. झोपडपटी हा विषय राष्ट्रीय नसुन आंतरराष्ट्रीय स्वरुपाचा आहे. झोपडपट्यामध्ये राहणाऱ्या लोकांच्या अनेक समस्या आहेत. कारण झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या नागरीकांना कोणत्याही सोयी सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांच्या आरोग्य, शिक्षण, व्यवसाय, मुलभुत गरजा इत्यादी समस्या त्यांना मोठ्या प्रमाणात भेडवसावतात. प्रस्तुत संशोधनातून "झोपडपट्टीतील लोकांची आर्थिक स्थिती काय आहे, कोणता व्यवसाय करतात, उत्पन्न किती होते, बचत करतात काय? त्यांना आरोग्य विषयी कोणकोणत्या समस्या येतात, मुले शाळेत जातात काय? इत्यादी माहिती घेता येईल."

प्रस्तुत संशोधन हा विषय आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावरचा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे या प्रश्नाचा अनुषंगाने माझे संशोधन हे निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

1. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या उत्पन्नाची पातळी जाणून घेणे.
4. झोपडपट्टीतील लोकांची बचत जाणून घेणे.
5. झोपडपट्टीतील लोकांच्या सामाजिक स्तर अभ्यासणे.
6. झोपडपट्टीतील लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

संशोधनाची गृहिते :

1. झोपडपट्टीतील लोकांच्या उत्पन्नाची पातळी कमी आहे.
2. झोपडपट्टीतील लोकांची बचतीची पातळी कमी आहे.

3. झोपडपट्टीतील लोकांचा सामाजिक, दर्जा स्तर निम्न आहे.

4. झोपडपट्टीतील लोकांमध्ये व्यसनधिनता मोठ्या प्रमाणात आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातीलसंशोधन पद्धतीनुसार सर्वेक्षणात्मक व तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करणार असून तथ्य संकलनासाठी प्राथमिक संमक (सामुग्री) आणि द्वितीय समंक (सामुग्री) पद्धतीचा अवलंब करणार आहे.

†) तथ्य संकलन पद्धती :

तथ्य संकलन करण्याच्या दोन पद्धती आहेत. एक प्राथमिक संमक व दुसरी म्हणजे द्वितीय संमक होय.

1. प्राथमिक समंक :

प्रस्तुत संशोधनासाठी अचुक माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात येईल. झोपडपट्टीतील राहणाऱ्या लोकांची आर्थिक स्थिती व सामाजिक स्थिती जाणुन घेण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा उपयोग करण्यात येईल.

2. द्वितीय संमक

प्रस्तुत संशोधनाच्या पुर्णत्वाकरिता आवश्यक असणारी माहिती प्राथमिक संमकाच्या सहाय्याने प्राप्त केली जाईल. तर उर्वरित माहिती द्वितीय संमकाच्या सहाय्याने प्राप्त करण्यात येईल. जे संमक स्वतः संशोधन कर्त्याचे नसून व्यक्ती किंवा संस्था यांनी या अगोदरच ती संकलित केलेली आहेत, त्याला द्वितीय संमक असे म्हणतात. यामध्ये अप्रकाशित व प्रकाशित कागदपत्रे, अभिलेख अहवाल, हस्तलिखीत पत्रे, दैनंदिनी, मासिके, संशोधन पत्रिकेतून प्रसिद्ध झालेले लेख, शासनाचे वार्षिक अहवाल, इंटरनेट वरील साहित्य, विविध पुस्तके व अहवाल या सर्वांचा आधार घेण्यात येईल.

नमुना निवड पद्धती :

झोपडपट्टीतील लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ नाशिक जिल्हा या विषयावरील संशोधनासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीमधील कोटा ह्या पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तसेच नमुना म्हणून निवडलेल्या उत्तरदात्याची निवड देखील कोटा पद्धतीनेच केली जाईल.

प्रस्तुत संशोधनासाठी नाशिक जिल्ह्यातील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या एकुण ३०० कुटुंबाची निवड करण्यात येईल. त्यापैकी नाशिक जिल्ह्यात असलेल्या १५ तालुक्यातून प्रत्येकी १० कुटुंबाची निवड करण्यात येईल म्हणजेच १५० कुटुंब व उर्वरित १५० कुटुंबाची निवड ही नाशिक शहरातून करण्यात येईल. अशा प्रकारे एकुण ३०० कुटुंबाची निवड करुन त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात येईल.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधनाच्या उद्दिष्टानुसार अभ्यास करण्यासाठी २०१५ ते २०२० या कालावधीची निवड करण्यात आलेली आहे. या कालावधी दरम्यान नाशिक जिल्ह्यातील झोपडपट्टीतील लोकांचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात येईल.

संशोधनाचा कालावधी :

प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टानुसार अभ्यास करण्यासाठी सन २०१५-१६ ते २०१९-२० या पाच वर्षाचा कालावधी निवडला आहे. या कालावधी दरम्यान झोपडपट्टीतील राहणाऱ्या लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात येईल.

आकडेवारीचे विश्लेषण :

आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय साधनाचा वापर करण्यात येईल. त्यात प्रामुख्याने सरासरी वृद्धीदर, सिमा विस्तार, प्रमाप विचरण व विचरण गुणक इत्यादी सांख्यिकीय साधनाचा वापर करण्यात येईल.

प्रकरणाची मांडणी :

प्रस्तुत संशोधन एकुण सहा प्रकरणामध्ये करण्यात येईल.

1. प्रकरण १ ले - प्रस्तावना
2. प्रकरण २ रे - संशोधन पद्धती
3. प्रकरण ३ रे - संशोधन साहित्याचा आढावा
4. प्रकरण ४ थे - नाशिक जिल्ह्याचा समग्र आढावा
5. प्रकरण ५ वे - नाशिक जिल्ह्यातील झोपडपट्टीतील लोकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास.
6. प्रकरण ६ वे - निष्कर्ष व शिफारशी.

ÃÖ¤¾³Ö ÃÖ“Öß :

1. प्रा.भोसले के.एम., भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१८.
2. गौरव दत्त, अश्विनी महाजन, भारतीय अर्थव्यवस्था, एस.चन्द ऍण्ड कंपनी प्रा.लि. नवी दिल्ली, २०१७.
3. रमेश सिंह, भारतीय अर्थव्यवसथा, मॅग्राहिल एज्युकेशन प्रा.लि.२०१४.
4. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८
5. नाशिक जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल महाराष्ट्र शासन, २०१७.
6. भारतीय जनगणना अहवाल.

संशोधक

कोळी सुलक्षणा हरी

<´Ö.<., <´Ö.×±ú»Ö (†£Ö¿ÖÖÃ¡Ö)

मार्गदर्शक

डॉ.एम.एन.बिरादार

सहयोगी प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक अर्थशास्त्र विभाग

कै.दिगंबरराव बिंदु महाविद्यालय भोकर